**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन

- विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी आंबेडकरांना अभिप्रेत जातीविरहित समाजासाठी प्रयत्न करायला हवे, असं राज्यपालांचं प्रतिपादन

- गुजरातजवळ अरबी समुद्रातून अठराशे कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

**आणि**

- मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी गारांचा पाऊस; येत्या दोन दिवसांत कोकण, मराठवाडा आणि विदर्भात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी आज देशभरात साजरी होत आहे. बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त त्यांना देशभरात अभिवादन केलं जातंय.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, राज्यसभेतले सभागृह नेते जे. पी. नड्डा, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसद भवन संकुलातल्या आंबेडकर यांच्या पुतळ्याला आज अभिवादन केलं.

<><><><><>

जीवनातल्या असंख्य अडचणींवर मात करून बाबासाहेबांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आणि आपल्या कर्तृत्वामुळे जगभरात आदराचं स्थान प्राप्त केलं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

बाबासाहेबांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचं स्वप्न साकार करू शकतोय. बाबासाहेबांची तत्वं, त्यांचे आदर्श, स्वावलंबी आणि विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या संदेशात म्हणाले.

कोट्यवधी दलित आणि इतर मागास समुदायांसाठी बाबासाहेब भारतातच नव्हे तर जगभरात आशा, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाचं मूर्तिमंत प्रतीक म्हणून ओळखले जातात, अशा शब्दांत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे.

बाबासाहेबांनी चुकीच्या रुढी परंपरांमधून देशाला बाहेर काढून सर्वांना समान अधिकार मिळवून दिला, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. तर महामानव, विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या अलौकिक कार्याचं, विचारांचं कृतज्ञतापूर्वक स्मरण करुन त्यांना भावपूर्ण अभिवादन, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी  मुंबईच्या चैत्यभूमीवर राजकीय नेत्यांसह भीम अनुयायी पहाटेपासून जमा झाले आहेत.  राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर मंत्र्यांनी देखील चैत्यभूमीला भेट देऊन आंबेडकरांना अभिवादन केलं.

जातीयवाद हा अभिशाप असून विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी आंबेडकरांना अभिप्रेत जातीविरहित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपालांनी केलं. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणापासून देशाला वाचविलं तर बाबासाहेबांनी समतेसाठी आपलं जीवन वेचलं असं राज्यपाल म्हणाले.

संविधानाच्या माध्यमातून देशाची एकता आणि अखंडता कायम ठेवण्याचं अमूल्य कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलं आहे. आज आपण जो एकसंघ भारताचा अनुभव घेत आहोत, त्याचा आधारस्तंभ संविधान हेच आहे, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड-मुख्यमंत्री बाइट..**

आंबेडकर जयंतीनिमित्त मुंबईत आज ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड तालुक्यातल्या आंबडवे या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावीही आज त्यांची जयंती साजरी करण्यात आली. जगभरातून अभ्यासक आणि पर्यटक येतील असं भव्यदिव्य स्मारक आंबडवे गावी उभारलं जाईल, हे स्मारक बाबासाहेबांच्या विचारांचं म्हणजेच ज्ञानस्मारक असेल, अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी यावेळी केली.

नागपूरमध्ये बुद्ध विहारांमध्ये वंदना आणि अभिवादनाचे कार्यक्रम होत आहेत. दीक्षाभूमी तसंच संविधान चौकातही अभिवादनासाठी भीम अनुयायांच्या रांगा लागल्या आहेत. नागपुरातल्या अनेक भागात मोटार सायकल रॅली काढण्यात आली असून त्यात शेकडो अनुयायी सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून----

**व्हाईस कास्ट (१,१७ सेकंद)**

***पनवेल*** *महानगरपालिकेच्या वतीने आज ढोल-ताशा, लेझीम, चित्ररथांसह भव्य मिरवणुकीचं आयोजन करण्यात आलं. त्याचबरोबर निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांसारख्या विविध कार्यक्रमांचं आयोजन करून डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त* ***रायगड*** *जिल्हा समाज कल्याण विभागाच्या वतीने आज भीम पदयात्रा काढण्यात आली.*

***अहिल्यानगर*** *जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातल्या विविध भागातून या निमित्ताने मिरवणुका काढण्यात आल्या. आंबेडकर जयंतीनिमित्त* ***धुळे*** *शहरातल्या प्रमुख चौकांमध्ये आज आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. शहरातल्या मध्यवर्ती बसस्थानकाजवळच्या बाबासाहेबांच्या स्मारकाला अभिवादन करण्यासाठी आज भीम अनुयायी मोठ्याप्रमाणात जमा झाले होते.* ***जालना*** *शहरासह जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.* ***चंद्रपूर*** *जिल्ह्यात जिल्हा प्रशासनाच्या वतीने डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यात आलं.* ***गडचिरोली*** *जिल्ह्यातही बाबासाहेबांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आलं.* ***वाशिम*** *जिल्ह्यात आंबेडकर जयंतीनिमित्ताने संविधान वाटप, रक्तदान शिबीर अशा कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.*

**<><><><><>**

अरबी समुद्राजवळ भारतीय सागरी सीमेजवळ गुजरात दहशतवाद विरोधी पथक आणि भारतीय तटरक्षक दलाने काल पहाटे केलेल्या कारवाईत १ हजार ८०० कोटी रुपये किमतीचे ३०० किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. मुद्देमाल गुजरात एटीएसकडे सोपवण्यात आला असून एटीएस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यानी या कारवाईबाबत भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात पोलिसांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी सात कोटी ८५ लाख रुपये किमतीचे ७८५ ग्रॅम अंमली पदार्थ जप्त केले आहेत. याप्रकरणी एका परदेशी नागरिकाला अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

लोकसंख्येच्या, महानगरांच्या तसंच औदयोगिक क्षेत्रांच्या वाढीमुळं आगीसारख्या आपत्तींना तोंड देणं आव्हानात्मक ठरत असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज मुंबईत राजभवन इथं केलं. ते राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त आयोजित अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ केल्यानंतर बोलत होते.

**<><><><><>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन आणि आणीबाणी सेवा विभागात आजपासून अग्निशमन सेवा सप्ताह सुरु झाला. सेवा बजावताना प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांच्या स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून या सप्ताहाचा आज शुभारंभ करण्यात आला. हा सप्ताह २० एप्रिलपर्यंत पाळला जाणार आहे.

**<><><><><>**

देशभरात सध्या पोषण पंधरवडा सुरू आहे. यानिमित्त गडचिरोली जिल्ह्यात लोकांचं मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण करण्यात आलं. याविषयी अधिक जाणून घेऊया जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांच्याकडून

**होल्ड - गडचिरोली बाइट……**

**<><><><><>**

गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेला टँकर चालकांचा  संप आज मागे घेण्यात आला. मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी आणि मुंबई वॉटर टँकर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या आज झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

केंद्रीय भू-जल प्राधिकरणाच्या नियमांनुसार महानगरपालिकेनं बजावलेल्या नोटिसांना १५ जून पर्यंत स्थगिती देऊ, असं आयुक्त गगराणी यांनी बैठकीत सांगितलं.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी आज गारांचा पाऊस पडला. मराठवाड्यातही काही ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. राज्यात आज सर्वात जास्त तापमान अकोला इथं ४२ पूर्णांक ४ अंश सेल्सिअल नोंदवण्यात आलं.

**//<><><><><>//**